ANNEXURE - III

Maharashtra University of Health Sciences, Nashik

## Trust Deed / Bylaws / Registration Certificate (Trust / Hospital (Bombay Nursing Act))

**Faculty :- Dental**
**Name of College/Institute :- Dr. Rajesh Ramdasji Kambe Detnal College & Hospital, Akola**

| | | |
|---|---|---|
| Name of Trust / Society | | **Sakshi Shikshan Krida Prasarak Va Bahu. Sanstha** |
| Registration Certificate | | Trust / Society Society :- **F-7649**<br><br>Hospital (Bombay Nursing Act) :- **07/2017** |
| Name of the College / Institute (As per First Affiliation letter) | : | **Sakshi Shikshan Krida Prasarak & Bahuuddeshiya Sanstha's Dr. Rajesh Ramdsji Kambe Dental College & Hospital** |
| Address | : | **At. Post. Kanheri (Sarap) Tal. Barshitakli, Dist. Akola. Pin code 444401** |
| Email ID | : | **dr.rrkdental@gmail.com** |
| Telephone / Mobile No.(s) | : | **9552566277** |
| Website | : | rrkdental.info |
| College Code | : | **115105** |

**Member of LIC** **Member of LIC** **Member of LIC** **Chairman of LIC**

Exh. 05

परिशिष्ट "ब"

साक्षी शिक्षण,क्रीडा प्रसारक व बहुउद्देशीय संस्था, मुर्तिजापुर,

ता.मुर्तिजापुर,जि.अकोला. र.न :- एफ-७६४९

या संस्थेचे

# सुधारित मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशन

०१. संस्थेचे नांव : साक्षी शिक्षण,क्रीडा प्रसारक व बहुउद्देशीय संस्था, मुर्तिजापुर,ता.मुर्तिजापुर,जि. अकोला.

०२. कार्यालयाचा पत्ता: सौ.अनुश्री राजेश कांबे यांचे घर, मु.पो. मुर्तिजापुर,ता. मुर्तिजापुर,जि.अकोला.

०३. संस्थेचे उद्देश:-

०१. शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणे.त्यासाठी बालवाडी,बालक मंदीर,कॉन्व्हेंट स्कुल, प्राथमिक शाळा, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,कन्याशाळा, आश्रमशाळा, तंत्र विद्यालय,व्यवसाय शिक्षण देणाऱ्या शाळा व प्रशाळा, सैनिकी शाळा, शेतकी शाळा,औद्योगिक प्रशिक्षण संस्था,संगणक प्रशिक्षण संस्था स्थापन करणे व चालविणे.

०२. निवासाची सोय असलेली किंवा अशी सोय नसलेले अंध विद्यालय, अपंग विद्यालय, मुकबधीर विद्यालय, मतीमंद मुलांचे विद्यालय स्थापन करणे व चालविणे.

०३. कला,वाणिज्य,विज्ञान,आभियांत्रिकी,कृषी,वैद्यकीय व दंतवैद्यकीय,या विद्याशाखेतील तसेच इतर विद्याशाखेतील महाविद्यालये स्थापन करणे व चालविणे.

०४. संगीत,गायन,वादन,नृत्य व अभिनय या कलांचे शिक्षण देणारी विद्यालये व महाविद्यालये स्थापन करणे व चालविणे. नाटयगृह निर्मीती करणे. या कलांच्या स्पर्धा आयोजित करणे.

०५. शिवणकला, हस्तकला,चित्रकला,शिल्पकला व इतर ललितकला यांचे शिक्षण देणारी विद्यालये व महाविद्यालये स्थापन करणे व चालविणे.

०६. निरक्षर जनतेत साक्षरतेचा प्रचार व प्रसार करणे. त्यासाठी प्रौढ शिक्षण वर्ग सुरू करणे चालविणे.श्रमिक मुलांना,मुलींना व प्रौढांना शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी यासाठी रात्रशाळा स्थापन करणे व चालविणे.

०७. शिक्षण घेणाऱ्या मुलांसाठी व मुलीसाठी विद्यार्थी वसतीगृह स्थापन करणे व चालविणे.

०८. पर्यावरणात होणारी घसरण रोखण्यासाठी व प्रदुषणाचे प्रतिकुल परिणाम सौम्य होण्यासाठी लोकांत वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन करण्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी आवश्यक प्रचार करणे. सामाजिक वनीकरण कार्यक्रम राबविणे.

०९. महिला व बाल कल्याणाच्या केंद्र व राज्य शासनाच्या योजना राबविणे. त्या अनुशंगाने अंगणवाडी, पाळणाघर,बाल सुधारगृह, बाल संगोपन केंद्र, अनाथाश्रम, श्रमिक महिला वसतीगृह इत्यादी स्थापन करणे व चालविणे.

Anushree Rajesh Kambe



Dean
Dr. Rajesh Ramdasji Kambe Dental College & Hospital, Kanheri Sarap
Tq. Barshitakli. Dist. Akola

१०. ठिकठिकाणी सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय स्थापन करणे व चालविणे.

११. जनतेत व्यायाम,क्रिडा व खेळ यांची आवड निर्माण करण्याचा प्रयत्न करणे.व्यायामशाळा, योगाभ्यास केंद्र;आखाडे,क्रिडा मंडळ, क्रिडा संकुल,हेल्थ क्लब इत्यादी स्थापन करणे व चालविणे. विविध प्रकारचे व्यायाम,शारिरीक कसरती,क्रिडा व खेळ शिक्षण व प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे. क्रीडा स्पर्धा आयोजित करणे.

१२. शहरी व ग्रामीण भागात आरोग्य सेवा उपलब्ध करणे. त्यासाठी दवाखाने,ग्रामीण रूग्णालये चिकीत्सालये,औषधालये, निसर्गोपचार केंद्र, सुतिकागृहे व सुश्रूषागृहे स्थापन करणे व चालविणे, रोग चिकीत्सा शिबीरे, नेत्र व दंत चिकीत्सा शिबीरे, कुटूंब कल्याण शिबीरे,आरोग्य शिक्षण शिबीरे, रक्तदान शिबीर आयोजित करणे. गरीब, गरजू व निराधार व्यक्तिंना वैद्यकीय उपचारासाठी शक्य ती मदत देणे किंवा त्यांच्या उपचाराची शक्य ती व्यवस्था करणे.रूग्णवाहिका सेवा उपलब्ध करणे.

१३. साठ किंवा त्यापेक्षा जास्त वय असलेल्या पुरूषांसाठी तसेच ५५ किंवा त्यापेक्षा जास्त वय असलेल्या, स्त्रियांसाठी,ज्यांना आश्रयाची गरज आहे, वृध्दाश्रम स्थापन करणे व चालविणे.

१४. सर्वसामान्य जनतेचे जिवनमान उंचावून त्यांचा सामाजिक व आर्थिक विकास व्हावा यासाठी त्यांना स्वयंरोजगार सुरू करण्यास प्रोत्साहन देणे व मार्गदर्शन करणे .सर्वसामान्य जनतेला रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी खादी ग्रामोद्योग आयोगाद्वारा किंवा शासनाद्वारा पुरस्कृत जनकल्याणाचे विविध प्रकल्प सुरू करणे व चालविणे. तसेच अशा प्रकल्पाबाबत आवश्यक प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे. ग्रामीण क्षेत्रामध्ये कृषी व ग्रामीण विकासाचे कार्य करणे व त्या आनुशंगाने शासनाद्वारा पुरस्कृत पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम, भारतीय विकास लोक कार्यक्रम,कामधेनू योजना,अन्नपुर्णा योजना अंतर्गत मोडणारे प्रकल्प व योजना सुरू करणे व चालविणे.

१५. जनतेचा बौध्दीक,मानसिक,नैतिक,आध्यात्मिक,सामाजिक व सांस्कृतिक विकास व्हावा व त्यांच्यात सामाजिक व राष्ट्रीय प्रश्नांबाबत जागरूकता निर्माण व्हावी यासाठी व्याख्यान,प्रवचन,परिसंवाद,चर्चासत्र मेळावे,शिबीरे, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम यांचे आयोजन करणे व त्याद्वारा आवश्यक प्रबोधन करण्याचा प्रयत्न करणे. सांस्कृतिक भवन, समाज भवन, मंगल कार्यालय बांधणे व त्याची व्यवस्था पाहणे.

१६. व्यसनमुक्ती,अंधश्रम निर्मूलन,हुंडा प्रथा निर्मूलन, बाल कामगार प्रथाचे निर्मूलन इत्यादी समाज कल्याणे कार्यक्रम राबविणे.

१७. नैसर्गिक व अनैसर्गिक आपत्तीच्य वेळी आपत्तीग्रस्तांना अन्न,वस्त्र,निवारा व वैद्यकीय मदत किंवा आर्थिक मदत उपलब्ध व्हावी यासाठी निधी गोळा करून मदत करणे.

१८. सर्वसामान्य जनतेत काटाकसर, स्वावलंबन व सहकार यांचा प्रसार होण्यास उत्तेजन देणे. लग्न कार्य व इतर सामाजिक कार्यप्रसंगी होणारा अनाठाई खर्च टाळण्याबाबत आवश्यक प्रबोधन करणे. वधु-वर परिचय मेळावे, सामुदायिक विवाह यांचे आयोजन करणे व्यवस्थापन करण



धर्मादाय आयुक्त
CHARITY COMMISSIONER
सत्यमेव जयते
REGION AKOLA

Dean
Dr. Rajesh Ramdasji Kambe Dental
College & Hospital, Kanheri Sarap
Tq. Barshitakli. Dist. Akola

०४. "साक्षी शिक्षण क्रिडा प्रसारक व बहुउद्देशीय संस्था ,मुर्तिजापूर ,ता.मुर्तिजापूर ,जि.अकोला." या संस्था नियम व नियमावली प्रमाणे ज्या कार्यालय मंडळावर सदरहू संस्थेची व्यवस्था वा कारभार सोपविण्यात आलेला आहे, आशा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांची संपूर्ण नांवे,पत्ते,हूद्दे,वय,व्यवसाय व राष्ट्रीयत्व खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | सभासदाचे संपूर्ण नाव व पत्ता | हुद्दा | वय | व्यवसाय | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | सौ.अनुश्री राजेश कांबे, मेन रोड,मुर्तिजापुर,ता.मुर्तिजापुर, जि.अकोला. | अध्यक्ष | ३२ | घरकाम | भारतीय |
| ०२. | जाकीर बीन उमर चाऊस, व्दारा : महाराष्ट्र मेडीकल ,मेन रोड , मुर्तिजापुर ,ता.मुर्तिजापुर,जि.अकोला. | उपाध्यक्ष | ३९ | शेती | भारतीय |
| ०३. | राजेश रामदासजी कांबे ,मेन रोड, मुर्तिजापुर,ता.मुर्तिजापुर,जि.अकोला. | सचिव | ३८ | डॉक्टर | भारतीय |
| ०४. | श्री.अविनाश उत्तमराव गणेशपुरे , व्दारा : महाराष्ट्र मेडीकल ,मेन रोड , मुर्तिजापुर,ता.मुर्तिजापुर,जि.अकोला. | कोषाध्यक्ष | २५ | शेती | भारतीय |
| ०५. | सौ.स्नेहा सुनिल कांबे,मेन रोड, मुर्तिजापुर,ता.मुर्तिजापुर,जि.अकोला. | कार्यकारी सभासद | २५ | घरकाम | भारतीय |
| ०६. | सौ.अर्चना संजय वैद्य,अमृतवाडी , मुर्तिजापुर,ता.मुर्तिजापुर,जि.अकोला. | कार्यकारी सभासद | २४ | घरकाम | भारतीय |
| ०७. | श्री.पुरुषोत्तम शंकरराव भडांगे, व्दारा : श्री.रा.श्री.कांबे,मेन रोड, मुर्तिजापुर,ता.मुर्तिजापुर,जि.अकोला. | कार्यकारी सभासद | ३८ | घरकाम | भारतीय |

Dean
Dr. Rajesh Ramdasji Kambe Dental
College & Hospital, Kanheri Sarap
Ta. Barshitakli. Dist. Akola

०५. आम्ही खालील सह्या करणारे "साक्षी शिक्षण क्रिडा प्रसारक व बहुउद्देशीय संस्था ,मुर्तिजापूर ,ता.मुर्तिजापूर ,जि.अकोला."या संस्थेचे सभासद जाहीर करतो की ,संस्था नोदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत असलेली अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असुन वरील उद्देशाने आम्ही एकत्र येवून "साक्षी शिक्षण क्रिडा प्रसारक व बहुउद्देशीय संस्था , मुर्तिजापूर , ता.मुर्तिजापूर , जि.अकोला." ही संस्था आज दिनांक ३०.०४.२००१ रोजी स्थापन केली असुन ती संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये करण्यासाठी आम्ही या मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशन वर सह्या केल्या आहेत.

| अ.क्र | सभासदाचे संपूर्ण नाव व पत्ता | सह्या |
|---|---|---|
| ०१. | सौ.अनुश्री राजेश कांबे, मेन रोड,मुर्तिजापुर,ता.मुर्तिजापुर, जि.अकोला. | Sau. Anushree Rajesh Kambe |
| ०२. | जाकीर बीन उमर चाऊस, व्दारा :महाराष्ट्र मेडीकल ,मेन रोड , मुर्तिजापुर ,ता.मुर्तिजापुर,जि.अकोला. | Zhause |
| ०३. | राजेश रामदासजी कांबे ,मेन रोड, मुर्तिजापुर,ता,मुर्तिजापुर,जि.अकोला. | Rajesh R. Kambe |
| ०४. | श्री.अविनाश उत्तमराव गणेशपुरे , व्दारा :महाराष्ट्र मेडीकल ,मेन रोड , मुर्तिजापुर,ता.मुर्तिजापुर,जि.अकोला. | Avinash U. ganeshpure |
| ०५. | सौ.स्नेहा सुनिल कांबे,मेन रोड, मुर्तिजापुर,ता.मुर्तिजापुर,जि.अकोला. | Sau. Sneha S. kambe |
| ०६. | सौ.अर्चना संजय वैद्य,अमृतवाडी , मुर्तिजापुर,ता.मुर्तिजापुर,जि.अकोला. | Sau. A. S. Vaidya |
| ०७. | श्री.पुरुषोत्तम शंकरराव भडांगे, व्दारा :श्री.रा.श्री.कांबे,मेन रोड, मुर्तिजापुर,ता.मुर्तिजापुर,जि.अकोला. | Shri P. S. Bhadange |

स्थळ :- मुर्तिजापुर

दिनांक :- ३०.४.२००१

वरील सह्या करण्याऱ्या सर्व इसमांना मी ओळखतो, त्यांनी माझ्या समक्ष मेमोरॅन्डम ऑफ असोशिएशन वर सह्या केल्या आहेत.

...............५.................

Dean
Dr. Rajesh Ramdasji Kambe Dental College & Hospital, Kanheri Sarap
Tq. Barshitakli. Dist. Akola

08/10
Copying application No. 2-1-2010
Copy applied for on 4-1-10
Copy ready on
Copy delivered on 5-1-10
Superintendent
Public Trusts Registration Office
Akola Region Akola
Reg. No. 731/01
Ex. No. 5
A.B.B
एफ-४६८९

परिशिष्ट 'क'

# साक्षी शिक्षण, क्रीडा प्रसारक व बहुउद्देशीय संस्था, मुर्तिजापुर, ता. मुर्तिजापुर, जि. अकोला.

## या संस्थेचे

# नियम व नियमावली

०१). **नियमावलीतील संदर्भिय शब्दांची व्याख्या :**

१). **संस्था :** संस्था म्हणजे "साक्षी शिक्षण, क्रीडा प्रसारक व बहुउद्देशीय संस्था, मुर्तिजापुर, ता. मुर्तिजापुर, जि. अकोला" असे समजण्यात येईल.

२). **सभासद :** सभासद म्हणजे या नियम व नियमावलीतील तरतुदीनुसार रितसर झालेले या संस्थेचे सभासद असे समजण्यात येईल.

३). **कार्यकारी मंडळ :** कार्यकारी मंडळ म्हणजे या नियम व नियमावलीतील तरतुदीनुसार रितसर निवडण्यात आलेले या संस्थेचे कार्यकारी मंडळ असे समजण्यात येईल.

४). **अध्यक्ष :** अध्यक्ष म्हणजे या नियम व नियमावलीतील तरतुदीनुसार रितसर निवडण्यात आलेला या संस्थेच्या कार्यकारी मंडळाचा अध्यक्ष असे समजण्यात येईल.

५). **उपाध्यक्ष :** उपाध्यक्ष म्हणजे या नियम व नियमावलीतील तरतुदीनुसार रितसर निवडण्यात आलेला या संस्थेच्या कार्यकारी मंडळाचा उपाध्यक्ष असे समजण्यात येईल.

६). **सचिव :** सचिव म्हणजे या नियम व नियमावलीतील तरतुदीनुसार रितसर निवडण्यात आलेला या संस्थेच्या कार्यकारी मंडळाचा सचिव असे समजण्यात येईल.

७). **कोषाध्यक्ष :** कोषाध्यक्ष म्हणजे या नियम व नियमावलीतील तरतुदीनुसार रितसर निवडण्यात आलेला या संस्थेच्या कार्यकारी मंडळाचा कोषाध्यक्ष असे समजण्यात येईल.

८). **कार्यकारी सभासद :** कार्यकारी सभासद म्हणजे या नियम व नियमावलीतील तरतुदीनुसार रितसर निवडण्यात आलेला या संस्थेच्या कार्यकारी मंडळाचा कार्यकारी सभासद असे समजण्यात येईल.

०२). **संस्थेचे कार्यक्षेत्र :**

या संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्याच्या भौगोलिक सिमेपर्यन्त मर्यादित राहील.

०३). **सभासदत्व व त्याची नोंदणीची पध्दत :**

अ). या संस्थेच्या कार्यक्षेत्रात राहणारी कोणतीही व्यक्ती, जिचे वय १८ वर्षापेक्षा कमी नाही व जिला या संस्थेचे ध्येय, उद्देश आणि ही नियम व नियमावली मान्य आहे, या संस्थेची सभासद होण्यास पात्र अशी व्यक्ती समजण्यात येईल.

Dean
Dr. Rajesh Ramdasji Kambe Dental College & Hospital, Kanheri Sarap

ब). या संस्थेचा सभासद होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीने सभासदत्व मिळण्यासाठी अध्यक्ष यांना उद्देशुन लेखी अर्ज केला पाहिजे. अशा अर्जासोबत या नियम व नियमावलीत यापुढे निर्धारित करण्यात आलेली सभासद शुल्काची रक्कम अग्रिम म्हणून जमा केली पाहिजे. सभासदत्वासाठी प्राप्त होणारे अर्ज कार्यकारी मंडळाच्या सभेत निर्णयासाठी ठेवण्यात येतील. कार्यकारी मंडळाच्या एकुण सभासद संख्येच्या २/३ (दोन तृतियांश) इतक्या सभासदांच्या संमतीने सभासदत्व प्रदान करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. कार्यकारी मंडळाच्या एकुण सभासद संख्येच्या २/३ (दोन तृतियांश) इतक्या सभासदांनी सभासदत्व प्रदान करण्यास संमती दिल्यास संबंधित व्यक्तीच्या नांवाची नोंद सभासद नोंदणी पुस्तकांत करण्यात येईल. कार्यकारी मंडळाच्या एकुण सभासद संख्येच्या २/३ (दोन तृतियांश) इतक्या सभासदांनी सभासदत्व प्रदान करण्यास संमती न दिल्यास संबंधित व्यक्तीस सभासदत्व नाकारण्यात आले असे समजण्यात येईल व अशा व्यक्तीने अर्जासोबत जमा केलेली सभासद शुल्काची अग्रिम रक्कम त्या व्यक्तीस परत करण्यात येईल. सभासदत्व प्रदान न करण्याची कारणे संबंधित व्यक्तीस कळविण्याचे कोणतेही बंधक कार्यकारी मंडळावर राहणार नाही. याबाबत कार्यकारी मंडळाच्या सभेत घेण्यात आलेला निर्णय अंतिम व निर्णायक राहील.

०४). <u>सभासदाचे प्रकार</u> :

अ). **<u>संस्थापक सभासद</u> :** या संस्थेच्या स्थापनेबाबत तयार करण्यात आलेल्या मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशन वर सह्या करणाऱ्या सर्व व्यक्तींना संस्थापक सभासद समजण्यात येईल.

ब). <u>आजिव सभासद</u> : आजिव सभासदत्वासाठी सभासद शुल्क रु.५०१/- (अक्षरी रुपये पांचशे एक फक्त) राहील. सभासद शुल्क रु.५०१/- (अक्षरी रुपये पांचशे एक फक्त) एकमुस्त जमा करणाऱ्या व कार्यकारी मंडळाने रितसर सभासदत्व प्रदान केलेल्या व्यक्तीस आजिव सभासद समजण्यात येईल. आजिव सभासदाचे सभासदत्व आजिवन राहील.

क). **<u>साधारण सभासद</u> :** साधारण सभासदत्वासाठी सभासद शुल्क रु.५१/- (अक्षरी रुपये एक्कावन्न फक्त) राहील. सभासद शुल्क रु.५१/- (अक्षरी रुपये एक्कावन्न फक्त) एकमुस्त जमा करणाऱ्या व कार्यकारी मंडळने रितसर सभासदत्व प्रदान केलेल्या व्यक्तीस साधारण सभासद समजण्यात येईल.

०५). **<u>सभासदत्व रद्द होणे किंवा करणे</u> :**

अ). सभासद मरण पावल्यास अथवा सभासदाने सभासदत्वाचा राजिनामा दिला असल्यास व तो राजिनामा कार्यकारी मंडळाने रितसर मान्य केला असल्यास अथवा सभासद संस्थेच्या कार्यक्षेत्राबाहेर कायम वास्तव्यासाठी गेल्यास, अशा सभासदाचे सभासदत्व संपुष्टात येईल.

ब). संस्थेच्या कोणत्याही सभासदास (१) नैतिक अध:पाताचा अंतर्भाव होणाऱ्या कोणत्याही अपराधाबाबत फौजदारी न्यायालयात दोषी ठरविण्यात आले असल्यास, (२) सक्षम न्यायालयाने नादार घोषीत केले असल्यास व तो/ती अमुक्त नादार असल्यास, (३) सक्षम न्यायालयाने वेडा घोषीत केल्यास, अशा सभासदाचे सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

Dean
Dr. Rajesh Ramdasji Kambe Dental College & Hospital, Kanheri Sarap
Tq. Barshitakli, Dist. Akola

क). संस्थेच्या ध्येय व उद्देश या विरुध्द कार्य करणाऱ्या व/किंवा संस्थेच्या हितास नुकसान पोहचेल असे अकारण वर्तन करणाऱ्या सभासदाचे सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील. परंतु असा निर्णय घेण्यापुर्वी संबंधित सभासदास त्याची बाजू मांडण्याची व स्वतःचा बचाव करण्याची योग्य संधी दिली पाहिजे.

ड). उपरोक्त नियमानुसार सभासदाचे सभासदत्व रद्द करण्याचा निर्णय कार्यकारी मंडळाच्या एकुण सभासद संख्येच्या २/३ इतक्या सभासदांच्या संमतीने घेण्यात येईल.

०६). **सर्वसाधारण सभा, तिचे अधिकार व कार्य :**

अ). प्रत्येक वर्षातुन एकदा वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात येईल. सर्वसाधारण सभेत सर्व सभासदांना हजर राहण्याचा व सभेच्या कामकाजात भाग घेण्याचा हक्क राहील. प्रत्येक सभासदास एक मत देण्याचा हक्क राहील.

ब). कार्यकारी मंडळाने सादर केलेल्या वार्षिक अहवालावर विचारविनिमय करणे व त्यास मान्यता देणे, संस्थेच्या कार्याबाबत व/किंवा कामकाजाच्या पध्दतीबाबत धोरणात्मक निर्णय घेणे, संस्थेच्या हिशोबास मान्यता देणे, दर पांच वर्षानी कार्यकारी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची व कार्यकारी सभासदांची निवड करणे आणि या नियम व नियमावलीतील तरतुदीमध्ये बदल करणे ही सर्वसाधारण सभेची कार्ये व अधिकार राहतील.

०७). **सर्वसाधारण सभेची सुचना व गणपुर्ती :**

अ). सर्वसाधारण सभेची सुचना सभेच्या नियोजित तारखेच्या कमीत कमी दहा दिवस अगोदर मिळेल अशा बेताने प्रत्येक सभासदास अध्यक्ष यांच्या सहीने सुचना पुस्तकांतुन किंवा डाक पुस्तकांतुन देण्यात येईल किंवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्यात येईल.

ब). सर्वसाधारण सभेत संस्थेच्या एकुण सभासद संख्येच्या २/३ (दोन तृतियांश) इतक्या सभासदांची उपस्थिती गणपुर्तीसाठी आवश्यक राहील. सभेच्या नियोजित वेळेपासुन अर्ध्या तासाचे आंत गणपुर्तीसाठी आवश्यक असलेल्या संख्येइतके सभासद उपस्थित न झाल्यास, सभा गणपुर्ती अभावी तहकुब करण्यात येईल. तहकुब करण्यात आलेली सभा त्याच दिवशी व त्याच ठिकाणी सभेच्या नियोजित वेळेपासुन एक तासानंतर घेण्यात येईल व अशा तहकुब सभेला गणपुर्ती आवश्यक राहणार नाही. मात्र सभेबाबतच्या सुचनापत्रात ही तरतुद नमुद केलेली असावी.

०८). **विशेष सर्वसाधारण सभा व तिचे कार्य :**

संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेशिवाय विशेष सर्वसाधारण सभा कोणत्याही वेळी बोलावता येईल. विशेष सर्वसाधारण सभेत (१) संस्थेच्या नांवात बदल करण्याबाबत, (२) संस्थेच्या उद्देशात बदल करण्याबाबत, (३) संस्थेचे पुर्णतः वा अंशतः दुसऱ्या संस्थेत विलिनीकरण करण्याबाबत, (४) संस्था विसर्जित करण्याबाबत व (५) इतर तातडीच्या व महत्वाच्या विषयाबाबत विचारविनिमय करण्यात येईल व निर्णय घेण्यात येईल. विशेष सर्वसाधारण सभेची सुचना व गणपुर्ती वरील नियम क्रमांक ०७ प्रमाणे राहील.

Dean
Dr. Rajesh Ramdasji Kambe Dental
College & Hospital, Kanheri Sarap
Ta. Barshitakli, Dist. Akola

०९). **कार्यकारी मंडळ व पदाधिकाऱ्यांची रचना :**

या संस्थेचा कारभार पाहण्यासाठी एक कार्यकारी मंडळ राहील. अशा कार्यकारी मंडळात एकुण ०७ (सात) सभासद राहतील. कार्यकारी मंडळातील पदाधिकाऱ्यांची रचना खालील प्रमाणे राहील.

(१). अध्यक्ष .. .. १.
(२). उपाध्यक्ष .. .. १.
(३). सचिव .. .. १.
(४). कोषाध्यक्ष .. .. १.
(५). कार्यकारी सभासद .. ३.

१०). **कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणूकीची पध्दत :**

कार्यकारी मंडळाचा कार्यकाल ५ (पांच) वर्षाचा राहील. दर ५ (पांच) वर्षानी कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष या ०४ (चार) पदाधिकाऱ्यांची व ०३ (तीन) कार्यकारी सभासदांची निवड नियम १४ मधील तरतुदीनुसार गुप्त मतदान पध्दतीने त्या प्रयोजनासाठी बोलावण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या बहूमताने करण्यात येईल.

११). **कार्यकारी मंडळातील पदाधिकाऱ्यांची कामे :**

अ). **अध्यक्ष :-** अध्यक्ष हे (१) सर्वसाधारण सभेची तसेच कार्यकारी मंडळाच्या सभेची तारीख व वेळ ठरवतील व अशा सर्व सभेबाबतची सुचना स्वतःच्या सहीने काढून पाठवतील, (२) सर्वसाधारण सभेचे तसेच कार्यकारी मंडळाच्या सभेचे सभाध्यक्ष म्हणून काम पाहतील, (३) सर्व सभेच्या कामकाजावर व कार्यवाहीवर नियंत्रण ठेवतील व सभेत सुव्यवस्था राखतील, (४) सभेमध्ये कोणत्याही विषयावर किंवा प्रश्नावर समान मते पडल्यास त्या सभेचे सभाध्यक्ष म्हणून एक जादाचे निर्णयी मत देतील, (५) संस्था व/किंवा त्याव्दारा संचालित उपक्रम यांच्या उचित व्यवस्थापनास आवश्यक असलेले कर्मचारी, कार्यकारी मंडळाच्या मान्यतेस अधिन राहून, नियुक्त करतील, (६) संस्था व त्याव्दारा संचालित उपक्रम यांच्या वतीने कोणत्याही न्यायालयीन प्रकरणात किंवा शासकीय व निमशासकीय कार्यालयातील प्रकरणात कामकाज पाहतील, (७) संस्था व/किंवा त्याव्दारा संचालित उपक्रम यांच्या कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवतील.

ब). **उपाध्यक्ष :-** उपाध्यक्ष हे अध्यक्ष यांचे अनुपस्थितीमध्ये सर्व सभेचे सभाध्यक्ष म्हणून काम पाहतील व अध्यक्ष यांचे सर्व अधिकार व कर्तव्ये पार पाडतील.

क). **सचिव :-** सचिव हे (१) सर्वसाधारण सभेत व/किंवा कार्यकारी मंडळाच्या सभेत होणाऱ्या कामकाजाबाबत व निर्णयाबाबत च्या अचुक नोंदी ठराव पुस्तकांत नोंद करुन घेतील व अशा नोंदीचे पुढील सभेत वाचनं करुन त्यास मंजुरी मिळवतील, (३) कार्यकारी मंडळाच्या सभेत तसेच सर्वसाधारण सभेत मंजुर करण्यात आलेल्या ठरावांची अंमलबजावणी करतील व त्या आनुशंगाने आवश्यक कार्यवाही करतील, (४) संस्थेच्या दैनंदिन कामकाजाबाबतचा सर्व पत्रव्यवहार करतील, (५) संस्थेचे अभिलेखे (ठराव पुस्तक, नोटीस पुस्तक, मालमत्ता नोंद वही, सभासद नोंदणी पुस्तक इत्यादी) संस्थेच्या कार्यालयात सुरक्षित ठेवतील, (६) सभासदांची अद्यावत यादी विहित नमुन्यात ठेवतील.

Dean
Dr. Rajesh Ramdasji Kambe Dental
College & Hospital, Kanheri Sarap

क). **कोषाध्यक्ष :-** कोषाध्यक्ष हे (१) संस्था व/किंवा त्याव्दारा संचालित उपक्रम यांचा सर्व प्रकारचा आर्थिक व्यवहार करतील, (२) संस्था व /किंवा त्याव्दारा संचालित उपक्रम यांच्या आर्थिक व्यवहाराबाबतचे नियमित हिशोब ठेवतील अथवा लिहून घेतील, (३) दरवर्षी मार्च महिन्याच्या ३१ तारखेच्या शेवटी संस्था व त्याव्दारा संचालित उपक्रम यांचे हिशोब संतूलित करतील व ते कार्यकारी मंडळाने नियुक्त केलेल्या सक्षम लेखापरिक्षक यांच्याकडून तपासुन घेतील, (४) संस्था व त्याव्दारा संचालित उपक्रम यांचे लेखे व आर्थिक व्यवहाराबाबतचे इतर अभिलेखे संस्थेच्या कार्यालयात सुरक्षित ठेवतील.

ड). **कार्यकारी सभासद :-** कार्यकारी सभासद हे कार्यकारी मंडळाच्या सर्व सभेला उपस्थित राहतील व कार्यकारी मंडळाच्या कामकाजात सक्रिय भाग घेतील.

१२). **कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा :**

अ). दर ३ (तीन) महिन्यातुन एकदा कार्यकारी मंडळाची सभा घेण्यात येईल. अशा सभेस साधारण सभा असे संबोधण्यात येईल. याशिवाय कोणत्याही वेळी आवश्यकतेनुसार कार्यकारी मंडळाची अतिरिक्त सभा बोलावता येईल. अशा सभेस विशेष सभा असे संबोधण्यात येईल.

ब). कार्यकारी मंडळाच्या एकुण सभासद संख्येच्या १/३ (एक तृतियांश) इतक्या सभासदांनी कार्यकारी मंडळाची सभा बोलावण्याबाबत अध्यक्ष यांच्याकडे लेखी मागणी केल्यास व अशा मागणीपत्रात कार्यकारी मंडळाची सभा कोणत्या प्रयोजनासाठी आवश्यक आहे याबाबत स्पष्ट तपशील दिला असल्यास, अध्यक्ष यांनी त्यांना मागणीपत्र मिळाल्याचे तारखेपासुन १५ (पंधरा) दिवसाच्या आंत कार्यकारी मंडळाची सभा बोलावली पाहिजे. मागणीपत्र मिळाल्याचे तारखेपासुन १५ (पंधरा) दिवसाच्या आंत अध्यक्ष यांनी कार्यकारी मंडळाची सभा न बोलावल्यास, मागणीपत्रावर सह्या करणाऱ्या सभासदांपैकी कोणत्याही सभासदाच्या सहीने कार्यकारी मंडळाची सभा बोलावता येईल व अशा सभेत मागणीपत्रात नमुद केलेल्या विषयावर विचारविनिमय करुन निर्णय घेता येईल.

क). कार्यकारी मंडळाच्या सलग ३ (तीन) किंवा त्यापेक्षा जास्त सभेला पुर्व सुचनेशिवाय व/किंवा सबळ कारणाशिवाय अनुपस्थित राहणाऱ्या पदाधिकाऱ्याचे / कार्यकारी सभासदाचे कार्यकारी मंडळावरील सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील. याबाबतचा निर्णय कार्यकारी मंडळाच्या एकुण सभासद संख्येच्या २/३ (दोन तृतियांश) इतक्या सभासदांच्या संमतीने घेण्यात येईल. मात्र अशा निर्णय घेण्यापुर्वी संबंधित पदाधिकाऱ्यास /कार्यकारी सभासदास त्याची बाजू मांडण्याची व स्वत:चा बचाव करण्याची योग्य संधी दिलेली असावी.

१३). **कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना व गणपुर्ती :**

अ). कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना कार्यकारी मंडळाच्या प्रत्येक सभासदास सभेच्या नियोजित तारखेच्या कमीत कमी सात दिवस अगोदर मिळेल अशा बेताने अध्यक्ष यांच्या सहीने सुचना पुस्तकांतुन किंवा डाक पुस्तकांतुन देण्यात येईल किंवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्यात येईल.

ब). कार्यकारी मंडळाच्या सभेला कार्यकारी मंडळाच्या एकुण सभासद संख्येच्या २/३ (दोन तृतियांश) इतक्या सभासदांची उपस्थिती गणपुर्तीसाठी आवश्यक राहील. सभेच्या नियोजित

Dean
Dr. Rajesh Ramdasji Kambe Dental College & Hospital Kanheri Sarap
Tq. Barshitakli. Dist. Akola

वेळेपासुन अर्ध्या तासाचे आंत गणपुर्तीसाठी आवश्यक असलेल्या संख्येइतके सभासद उपस्थित न झाल्यास, सभा गणपुर्ती अभावी तहकुब करण्यात येईल. तहकुब करण्यात आलेली सभा त्याच दिवशी व त्याच ठिकाणी सभेच्या नियोजित वेळेपासुन एक तासानंतर घेण्यात येईल व अशा तहकुब सभेला गणपुर्ती आवश्यक राहणार नाही. मात्र सभेबाबतच्या सुचनापत्रात ही तरतुद नमुद केलेली असावी.

१४). **कार्यकारी मंडळाच्या निवडणूकीचे नियम :**

कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व कार्यकारी सभासदांची निवड दर ५ (पाच) वर्षानी त्या प्रयोजनासाठी आयोजित केलेल्या सर्वसाधारण सभेत गुप्त मतदान पध्दतीने उपस्थित सभासदांच्या बहूमताने करण्यात येईल. कार्यकारी मंडळाच्या बहूमताने सर्वसाधारण सभेची तारीख व निवडणूकीबाबतचा इतर संपुर्ण कार्यक्रम निश्चित करण्यात येईल. तसेच कार्यकारी मंडळाच्या निवडणूकीच्या संदर्भात आवश्यक कार्यवाही करण्यासाठी एक निवडणूक अधिकारी नियुक्त करण्यात येईल व अशा निवडणूक अधिकाऱ्यास निवडणुक घेण्याबाबत आवश्यक अधिकार प्रदान करण्यात येईल. यासंबंधीची सुचना अध्यक्ष व निवडणूक अधिकारी यांचे संयुक्त सहीने सभासदांच्या माहितीसाठी संस्थेच्या कार्यालयाचे सुचना फलकावर लावून प्रसिध्द करण्यात येईल. तसेच निवडणूक कार्यक्रमाची प्रत प्रत्येक सभासदास निवडणूक प्रक्रिया सुरु होण्याच्या तारखेपुर्वी कमीत कमी १० (दहा) दिवस अगोदर मिळेल अशा बेताने डाक पुस्तकांतुन देण्यात येईल किंवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्यात येईल. कार्यकारी मंडळाच्या निवडणूकीच्या प्रयोजनासाठी आयोजित केलेल्या सर्वसाधारण सभेची तारीख व निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द केल्याचा दिवस यामध्ये कमीत कमी २१ (एकवीस) दिवसाचे अंतर आवश्यक राहील. प्रसिध्द केलेल्या कार्यक्रमानुसार निवडणूकीच्या संदर्भात आवश्यक कार्यवाही करणे व त्या आनुशंगाने उपस्थित होणाऱ्या बाबींवर निर्णय घेण्याची शक्ती निवडणूक अधिकारी यांस राहील.

१५). **कार्यकारी मंडळातील रिक्त जागा भरण्याबाबत :**

कार्यकारी मंडळातील पदाधिकाऱ्याच्या किंवा कार्यकारी सभासदाच्या मृत्युमुळे किंवा राजिनाम्यामुळे किंवा अन्य कारणाने कार्यकारी मंडळात रिक्त होणारी जागा कार्यकारी मंडळाच्या हयात असलेल्या किंवा उरलेल्या सभासदांच्या बहूमताने संस्थेच्या सभासदामधुन भरण्यात येईल. अशा प्रकारे निवड करण्यात आलेल्या पदाधिकाऱ्याचा / कार्यकारी सभासदाचा कार्यकाळ त्या वेळी कार्यरत असलेल्या कार्यकारी मंडळाच्या उर्वरित कार्यकाळापुरता मर्यादित राहील.

१६). **कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये :**

संस्था व त्याव्दारा संचालित उपक्रम यांच्या कारभारावर व कामकाजावर नियंत्रण ठेवणे, संस्था व त्याव्दारा संचालिज उपक्रम यांच्या उचित व्यवस्थापनासाठी व कारभारासाठी आवश्यक असलेले कर्मचारी नियुक्त करणे, कर्मचाऱ्याच्या सेवाशर्ती व वेतन इत्यादी ठरविणे, कर्मचाऱ्यास सेवेतुन निलंबीत करणे किंवा बडतर्फ करणे किंवा कमी करणे, कार्यकारी मंडळातील रिक्त जागा भरणे, सभासदत्वासाठी प्राप्त होणाऱ्या अर्जावर निर्णय घेणे, दर पाच वर्षानी निवडणूक अधिकारी नियुक्त करणे, हिशोबाचे परिक्षण करण्यासाठी सक्षम लेखापरिक्षक नियुक्त करणे व संस्थेच्या उन्नतीच्या दृष्टीने आवश्यक असलेली कामे करणे ही कार्यकारी मंडळाची कर्तव्ये व अधिकार राहतील.

१७). **हिशोबाचे वर्ष :**

या संस्थेचे हिशोबाचे वर्ष १ एप्रील ते ३१ मार्च राहील. संस्था व त्याव्दारा संचालिज उपक्रम यांचे हिशोब प्रत्येक वर्षी मार्च महिन्यांचे ३१ तारखेच्या अखेरीस संतुलित करण्यात येतील.

१८). **संस्थेचा निधी, मिळकत व विनियोग :**

संस्था व त्याव्दारा संचालित उपक्रम यांस सर्व मार्गांने मिळणारे उत्पन्न व अन्य प्राप्ती यांस संस्थेचा निधी समजण्यात येईल. संस्था व त्याव्दारा संचालित उपक्रम यांनी संपादन केलेली किंवा त्यास मिळालेली सर्व जंगम व स्थावर मालमत्ता ही संस्थेची मिळकत समजण्यात येईल. संस्थेच्या निधीचा व मिळकतीचा विनियोग संस्थेच्या प्रयोजनावर व उद्देशावर करण्यात येईल.

१९). **उद्दिष्ट निहाय खर्चाची तरतुद :**

संस्थेव्दारा संचालित उपक्रमास मिळणाऱ्या उत्पन्नाचा व अन्य प्राप्तीचा विनियोग त्याच उद्देशावर करण्यात येईल. याशिवाय विशिष्ट उद्देशाच्या पुर्तीसाठी मिळणाऱ्या रकमेचा विनियोग त्याच उद्देशावर करण्यात येईल. संस्थेला मिळणाऱ्या सर्वसाधारण उत्पन्नातुन उद्दिष्टनिहाय खर्च खालील प्रमाणे करण्यात येईल.

(अ). शैक्षणीक उद्देशावर .. .. ५० %

(ब). इतर उद्देशावर .. .. .. ५० %

२०). **कर्ज किंवा ठेवी घेण्याबाबत तरतुद :**

मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियम १९५० या अधिनियमाचे कलम ३६ अे(३) नुसार धर्मादाय सह आयुक्त यांची पुर्व मंजूरी मिळवून व अशा मंजूरी आदेशात लादण्यात येतील अशा अटी व शर्ती यांस अधिन राहून संस्थेच्या प्रयोजनासाठी किंवा संस्थेच्या वतीने पैसा कर्ज म्हणून किंवा उसनवार म्हणून किंवा ठेव म्हणून स्विकारण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

२१). **स्थावर मालमत्तेची खरेदी/विक्री करण्याबाबत तरतुद :**

अ). संस्थेच्या उद्देशाच्या पुर्तीसाठी किंवा त्या आनुशंगाने आवश्यक नसलेली व निव्वळ उत्पन्न मिळविण्याचे हेतुने स्थावर मालमत्ता खरेदी करण्यासाठी संस्थेच्या निधीची गुंतवणूक करण्यापुर्वी धर्मादाय सह आयुक्त यांची मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियम १९५० या अधिनियमाचे कलम ३५ प्रमाणे परवानगी घेणे अनिवार्य राहील. परंतु संस्थेच्या उद्देशाच्या पुर्तीसाठी किंवा त्या आनुशंगाने आवश्यक असलेली स्थावर मालमत्ता खरेदी करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

ब). मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियम १९५० या अधिनियमाच्या कलम ३६ नुसार धर्मादाय सह आयुक्त यांची पुर्व परवानगी मिळवून व अशा परवानगी आदेशात लादण्यात येतील अशा अटी व शर्ती यांस अधिन राहून संस्थेची कोणतीही मालमत्ता विक्री करण्याचा किंवा ती अदलाबदल करण्याचा किंवा ती बक्षीस म्हणून देण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

Dean
Dr. Rajesh Ramdasji Kambe Dental College & Hospital, Kanheri Sarap
Ta. Barshitakli, Dist. Akola

२२). <u>सभासदांची यादी ठेवण्याबाबत :</u>

संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १५ आणि संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियम १९७१ मधील नियम १५ प्रमाणे अनुसूची सहा या विहित नमुन्यातील सभासद नोंदणी पुस्तकांत संस्थेच्या सभासदांची यादी ठेवण्यात येईल.

२३). <u>बँक खाते :</u>

अ). संस्थेचा निधी व पैसा मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियम १९५० चे कलम ३५ प्रमाणे गुंतविण्यात येईल. संस्थेचा पैसा संस्थेच्या प्रयोजनासाठी तात्काळ किंवा निकटवर्ती तारखेस लागत नसल्यास तो पैसा कोणत्याही अनुसूचित बँकेत किंवा डाक बचत बँकेत किंवा राज्य शासनाने मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियम १९५० चे कलम ३५ च्या प्रयोजनासाठी मान्यता दिलेल्या सहकारी बँकेत संस्थेच्या नांवाने ठेवण्यात येईल.

ब). बँकेतील पैसा काढण्याचा व्यवहार अध्यक्ष किंवा सचिव यापैकी एक व कोषाध्यक्ष अशा दोन पदाधिकाऱ्यांच्या संयुक्त सहीने करण्यात येईल.

२४). <u>नियम व नियमावलीत बदल करण्याची तरतुद :</u>

संस्थेच्या एकुण सभासद संख्येच्या २/३ (दोन तृतियांश) इतक्या सभासदांनी मान्यता दिल्यास कोणत्याही वेळी या नियम व नियमावलीतील तरतुदीमध्ये बदल करता येईल किंवा त्यातील तरतुदी रद्द करता येईल किंवा त्यात नवीन नियमाची भर घालता येईल.

२५). <u>संस्थेच्या नांवात व उद्देशात बदल करण्याबाबत :</u>

संस्था नोंदणी अधिनियम १८६० या अधिनियमाच्या कलम १२ आणि १२ अे मधील तरतुदींना अधिन राहून विशेष सर्वसाधारण सभेत संस्थेच्या एकुण सभासद संख्येच्या ३/५ (तीन पंचमाश) इतक्या सभासदांच्या संमतीने या संस्थेच्या नांवात व उद्देशात बदल करता येईल किंवा या संस्थेचे दुसऱ्या संस्थेत पुर्णत: वा अंशत: विलिनीकरण करता येईल.

२६). <u>संस्था विसर्जित करण्याबाबत :</u>

संस्था नोंदणी अधिनियम १८६० या अधिनियमाचे कलम १३ व १४ मधील तरतुदींना अधिन राहून विशेष सर्वसाधारण सभेत संस्थेच्या एकुण सभासद संख्येच्या ३/५ (तीन पंचमांश) इतक्या सभासदांच्या संमतीने ही संस्था विसर्जित करता येईल.

२७). <u>कार्यकारी मंडळातील सभासदांची माहिती कळविण्याबाबत :</u>

संस्था नोंदणी अधिनियम १८६० या अधिनियमाच्या कलम ४ आणि संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियम १९७१ मधील नियम ७ प्रमाणे संस्थेच्या कार्यकारी मंडळातील कार्यकारी सभासदांची माहिती अनुसूची एक या विहित नमुन्यात प्रत्येक वर्षी सहाय्यक संस्था निबंधक, अकोला विभाग, अकोला यांच्या कार्यालयात दाखल करण्यात येईल.

Dean
Dr. Rajesh Ramdasji Kambe Dental
College & Hospital, Kanheri Sarap
Tq. Barshitakli, Dist. Akola

२८). संस्थेच्या कर्मचाऱ्यांबाबतची माहिती कळविण्याबाबत :

संस्था नोंदणी अधिनियम १८६० या अधिनियमाच्या कलम ४ अे आणि संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियम १९७१ मधील नियम ८ प्रमाणे संस्थेने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांबाबतची माहिती अनुसूची दोन या विहित नमुन्यात प्रत्येक वर्षी सहाय्यक संस्था निबंधक, अकोला विभाग, अकोला यांच्या कार्यालयात दाखल करण्यात येईल.

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की ही प्रत **''साक्षी शिक्षण, क्रीडा प्रसारक व बहुउद्देशीय संस्था, मुर्तिजापुर,** ता. मुर्तिजापुर, जि. अकोला'' या संस्थेच्या नियम व नियमावलीची सत्य प्रत आहे.

०१. सौ. अनुश्री राजेश कांबे, अध्यक्ष. Sau. Anushri Rajesh Kambe

०२. जाकीर बीन उमर चाउस, उपाध्यक्ष. Za chaus

०३. डॉ. राजेश रामदासजी कांबे, सचिव. Rajesh Kambe

स्थळ : मुर्तिजापुर.
दिनांक : 30.8.07

सहाय्यक धर्मादाय आयुक्त ASSTT. CHARITY COMMISSIONER AKOLA REGION AKOLA सत्यमेव जयते अकोला विभाग अकोला

XEROX TRUE COPY
Madhoo
Superintendent
Public Trusts Registration Office
Akola Region Akola

Dean
Dr. Rajesh Ramdasji Kambe Dental College & Hospital, Kanheri Sarap
Tq. Barshitakli. Dist. Akola

Sakshi Shikshan Krida Prasarak and Bahuuddeshiya Sanstha, Murtizapur,(Maharashtra) R.N. MH/8471

## Governing Body

| S.N. | Name | Designation | Address |
|---|---|---|---|
| 1. | Sau Anushree Rajesh kambe . | President | Main Road, Murtizapur (Akola) |
| 2. | Jakirbeen Umar Chaus. | V- President | Maharashtra Mediacal, Main Road , Murtizapur |
| 3. | Dr. Rajesh Ramdas Kambe. | Secretary | Main Road , Murtizapur (Akola) |
| 4. | Avinash Uttamrao Ganeshpure. | Tresurer | Maharashtra Mediacal, Main Road , Murtizapur |
| 5. | Sau. Sneha Sunil Kambe. | Member | Main Road,Murtizapur. (Akola) |
| 6. | Sau. Archana Sanjay Vaidya. | Member | Amrutwadi, Murtizapur (Akola) |
| 7. | Purushottam Shankarrao Bhadange. | Member | Chandur Bz. Dist. Amravati |

**President**
Sakshi Shikshan Krida Prasarak & Bahuudd.
Sanstha, Murtizapur. R.N. MH/8471

Head - Master
Shri. Ashtavinayak English
Convent Sirso, Murtizapur

Dean
Dr. Rajesh Ramdasji Kambe Dental
College & Hospital, Kanheri Sarap
Tq. Barshitakli. Dist. Akola

# कार्यालय - जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला

दुरध्वनी क्रं : (०७२४)२४३७३७०, २४३५०७५
फॅक्स क्रं : (०७२४) २४३७३७०
E-mail : akl dhoakola@sancharnet.in
ldspakola@mail.com

दिनांक : 28 MAR 2025
जा.क्र. जिप/आवि/नुतनी नोदंणी/(619/२०२५

प्रति,

सचिव,
साक्षी शिक्षण क्रिडा प्रसारक व बहुउद्देशिय संस्था
मुर्तिजापूर ता. मुर्तिजापूर जि. अकोला

**विषय :- डॉ राजेश रामदासजी कांबे दंत महाविद्यालय व रुग्णालय (२०० डेन्टल चेअर) कान्हेरी सरप ता बार्शिटाकळी जि.अकोला या नावाने दवाखान्याचे नोंदणीचे नुतनीकरणाबाबत.**

संदर्भ :- १) दि. मुंबई नर्सिंग होम अॅक्ट १९४९ चे नियम ५ नुसार
२) महाराष्ट्र शासन राजपत्र- सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी नियम २०२१ दि.१४ जानेवारी २०२१ चे अधिसुचनेनुसार.
३) मा.संचालक आरोग्य सेवा संचालनालय पुणे यांच्या नोंदणीकृत रुग्णालयाची सहमाही तपासणीबाबतसुचना दि. २८.१२.२२
४) तालुका आरोग्य अधिकारी तालुका बार्शिटाकळी यांचे पडताळणी अहवाल जा.क्र. १६५ दि.०७.०५.२४
५) आपला विहीत नमुन्यातील अर्ज दि.१८.४.२४
६) आपण सादर केलेले शपथपत्र दि.१८.६.२४
७) आपले रुग्णालय कार्यालयाचे पत्र क्र. १७६८/२५ दि.७.३.२५

उपरोक्त संदर्भाधिन पडताळणी अहवाल व विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संदर्भ क्र.१ व संदर्भ क्र.२ ला व खालील अटी शर्तीला अधिन राहुन दि.०१ एप्रिल २०२४ ते दि.३१ मार्च २०२७ करीता आपले रुग्णालय **डॉ राजेश रामदासजी कांबे दंत महाविद्यालय व रुग्णालय (२०० डेन्टल चेअर) कान्हेरी सरप ता बार्शिटाकळी जि. अकोला** क्लिनीक/रुग्णालयाची नोंदणीचे नुतनीकरण करण्यात येत आहे.

१) तालुका आरोग्य अधिकारी तालुका मुर्तिजापूर यांना पडताळणी वेळी आढळुन आलेल्या सोयी सुविधा निरंतर क्लिनीक/रुग्णालयामध्ये राहतील याची जबाबदारी रुग्णालयाची राहील. तसेच संदर्भ क्र. २ नुसार व आपण सादर केलेले शपथपत्र याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी क्लिनीक/रुग्णालयाची राहील.
२) प्रस्तावासोबत सादर केलेल्या कागदपत्रांची मुळ प्रती क्लिनीक/हॉस्पीटलमध्ये असावीत व त्याबाबत अद्यावत मुळ प्रती क्लिनीक/रुग्णालयात उपलब्ध राहतील याची दखल घ्यावी.
३) क्लिनीक/हॉस्पीटलमध्ये कार्यरत असलेली डॉक्टर, नर्स यांचे सेवा सर्व प्रमाणपत्र व त्यांनी सेवा विषयक करारपत्र यांच्या मुळ प्रती क्लिनीक/हॉस्पीटलमध्ये राहतील याची दखल घ्यावी. यामध्ये कोणताही बदल झाल्यास त्याबाबत या कार्यालयास कळविण्याची जबाबदारी क्लिनीक/हॉस्पीटलची राहील.
४) प्रदुषण नियंत्रण मंडळाचे नियम व अटी बाबत प्रमाणपत्राची मुळ प्रत क्लिनीक/हॉस्पीटलमध्ये ठेवण्यात यावी. तसेच त्याचे नियमीत नुतनीकरण करण्यात येवुन त्याची एक सत्यप्रत या कार्यालयास वेळोवळी सादर करावी.
५) क्लिनीक/रुग्णालयात आलेल्या रुग्णांची आग, विज इत्यादीमुळे कोणतीही जिवीत हानी होणार नाही याची दखल घ्यावी व याबाबत सर्व प्रतिबंधात्मक व आपात्कालीन सुविधा क्लिनीक/रुग्णालयात २४ तास उपलब्ध राहील याची संपुर्ण जबाबदारी क्लिनीक/रुग्णालयाची राहील. रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र तात्कालीन उपलब्ध सोयींनुसार देण्यात आलेले आहे मात्र सदर सुविधा नियमीत उपलब्ध ठेवण्याची जबाबदारी क्लिनीक/रुग्णालयाची राहील.
६) क्लिनीक/हॉस्पीटल मध्ये सोनोग्राफी मशिन वापरण्याबाबत ही नोंदणी नसुन सोनोग्राफी मशिन वापरत असल्याचे आढळुन आल्यास त्याच दिवशी नोंदणी रद्द होईल. भविष्यात कधीही सोनोग्रॉफी मशिन वापरायची असल्यास पीसीपीएनडी कायदयातंर्गत त्याची नोंदणी करणे बंधनकारक राहील.
७) क्लिनीक/हॉस्पीटलची मासिक माहिती जसे ओपीडी, आयपीडी इत्यादी बाबतची संपुर्ण माहिती या कार्यालयास सादर करावी.
८) संदर्भ क्र. ३ नुसार तालुका आरोग्य अधिकारी यांच्याकडून क्लिनीक/हॉस्पीटल ची प्रत्येक वर्षी माहे जानेवारी व माहे जुलै मध्ये सहामाही प्रत्यक्ष तपासणी करण्यात येईल यावेळी त्यांना सहकार्य करण्यात यावे.
९) संदर्भ क्र. ७ नुसार आपल्या रुग्णालयामध्ये एकुण डेन्टल चेअर २०० आढळुन आलेत त्याअन्वये सदर बेड संख्येनुसार आपणास परवानगी देण्यात येत आहे.

उपरोक्त अटी व शर्तीच्या अधिन राहुन, सादर केलेले शपथपत्र व यान्वये आपले रुग्णालयाला दि.०१ एप्रिल २०२४ ते दि.३१ मार्च २०२७ या कालावधीकरीता रुग्णालयाची नोंदणीचे ~~तात्पुरत्या स्वरुपात~~ नुतनीकरण करण्यात येत आहे. उपरोक्त अटी व शर्तीचे पालन न झाल्यास सदर नोंदणी प्रमाणपत्र वैध राहणार नाही याची नोंद घ्यावी.

सहपत्र - नोंदणी प्रमाणपत्र

जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, अकोला

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, अकोला

प्रत माहितीस्तव सविनय सादर.
१) मा. जिल्हाधिकारी, अकोला
२) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अकोला
३) मा. उपसंचालक आरोग्य सेवा अकोला मंडळ अकोला

Dean
Dr. Rajesh Ramdasji Kambe Dental College & Hospital, Kanheri Sarap
Tq. Barshitakli, Dist. Akola

# आरोग्य विभाग जिल्हा परिषद अकोला

फार्म 'सी'

नियम "५" पहा

दि मुंबई नर्सिंग होमस् अॅक्ट १९४९ चे नियम - ५ नुसार

## - नोंदणीचा दाखला -

नोंदणी क्रमांक : 07/2097

दाखला देण्यात येते की, श्री/श्रीमती सजीव साक्षी डीगृज क्रीडा प्रसारक बहुउद्देशीय संस्था मुर्तिजापूर यांचे दि मुंबई नर्सिंग होमस् रजिस्ट्रेशन अॅक्ट १९४९ चे नुसार डॉ राजेश रामदासजी कांबे दंतमहाविद्यालय व रुग्णालय (नर्सिंग होमचे नांव) जे कान्हेरी सरप ता बार्शीटाकळी जि अकोला ह्या ठिकाणी भाड्याने/बांधलेले आहे त्यांना वरील प्रमाणे दर्शविल्या नुसार नर्सिंग होमस् चालविण्याची परवानगी देण्यात येत आहे.

- महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टीशनर अॅक्ट १९६१ नुसार
  नोंदणी क्रमांक A-3645
  दिनांक 17/06/1986

- दाखला दिल्याची दिनांक 26/03/2025

हा नोंदणीचा दाखला दिनांक १ एप्रिल 2024 ते दिनांक ३१ मार्च 2025 पर्यंत प्रमाणीत राहील.

टिप :- या कार्यालयाचे पत्र क्र. 1619/2025
दि. 26/03/25 च्या आधीन राहून.

नोंदणी अधिकारी
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, अकोला
आरोग्य विभाग जिल्हा परिषद अकोला

Dean
Dr. Rajesh Ramdasji Kambe Dental
College & Hospital, Kanheri Sarap
Tq. Barshitakli. Dist. Akola